मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# व्हॉट्सअ‍ॅपवरील एका संदेश सोडविणार वाहतूक कोंडी!

## पिंपरी-चिंचवड पोलिसांचा 'ट्रॅफिक बडी' व्हॉट्सअ‍ॅप उपक्रम यशस्वी

**पिंपरी | प्रतिनिधी**

वाहतूक कोंडी, बेशिस्त पार्किंग, सिग्नल बिघाड किंवा नियमभंग करणाऱ्या वाहनांची तक्रार करण्यासाठी आता नागरिकांना पोलीस ठाणे किंवा वाहतूक शाखेच्या कार्यालयात फेऱ्या मारण्याची गरज उरलेली नाही. मोबाईलवरील एका व्हॉट्सअ‍ॅप संदेशाच्या माध्यमातून नागरिकांच्या समस्या सोडविणारा 'ट्रॅफिक बडी' चॅटबॉट पिंपरी-चिंचवडकरांचा खरा वाहतूक मित्र ठरत असल्याचे समोर आले आहे. मे महिन्यात या माध्यमातून प्राप्त झालेल्या तब्बल एक हजार ३६५ तक्रारींचा निपटारा करण्यात आल्याने या उपक्रमाची प्रभावीता अधोरेखित झाली आहे.




पिंपरी-चिंचवड शहराचा झपाट्याने होत असलेला विस्तार, वाढती लोकसंख्या आणि रस्त्यांवरील वाहनांचा वाढता ताण यामुळे वाहतूक व्यवस्थेसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. अशा परिस्थितीत नागरिकांच्या सहभागातून वाहतूक व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या संकल्पनेतून 'ट्रॅफिक बडी' हा व्हॉट्सअ‍ॅप चॅटबॉट सुरू करण्यात आला. पोलीस सह आयुक्त शशीकांत महावरकर आणि अपर पोलीस आयुक्त सारंग आवाड यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम कार्यरत आहे. या चॅटबॉटचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे तक्रार नोंदविण्याची सुलभ प्रक्रिया आणि तातडीने होणारे निवारण. नागरिकांनी पाठविलेल्या तक्रारींवर २४ तासांच्या आत कारवाई केली जाते. कारवाईनंतर संबंधित तक्रारदाराला मोबाईलवर निवारणाचा अहवाल पाठविला जातो. त्यामुळे तक्रार प्रक्रियेत पारदर्शकता वाढली असून नागरिकांचा विश्वासही दृढ झाला आहे.

वाहतूक नियमांचे उल्लंघन, वाहतूक कोंडी, वाहतुकीतील अनियमितता, खराब रस्ते, बेकायदेशीर पार्किंग, ट्रॅफिक सिग्नलमधील बिघाड, वाहतूक सुधारणेबाबत सूचना तसेच अवजड वाहनांकडून होणारे नियमभंग अशा आठ विविधप्रकारच्या तक्रारी नागरिकांना फोटोसह थेट नोंदविता येतात. त्यामुळे घटनास्थळावरील वस्तुस्थिती प्रशासनापर्यंत त्वरित पोहोचत आहे. विशेष म्हणजे, हा उपक्रम केवळ तक्रारींपुरता मर्यादित नाही. शहरातील नागरिकांना वाहतूक व्यवस्थापनात प्रत्यक्ष योगदान देता यावे यासाठी स्वयंसेवक म्हणून नोंदणी करण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

त्यामुळे नागरिक आणि पोलीस यांच्यातील समन्वय अधिक मजबूत होत असल्याचे दिसून येत आहे. स्मार्ट सिटीच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या पिंपरी-चिंचवडमध्ये तंत्रज्ञानाच्या मदतीने वाहतूक समस्या सोडविण्याचा हा अभिनव प्रयोग यशस्वी ठरत आहे. एका महिन्यात एक हजार ३६५ तक्रारींचा निपटारा झाल्याने 'ट्रॅफिक बडी' हा केवळ चॅटबॉट नसून वाहतूक व्यवस्थापनातील प्रभावी डिजिटल शस्त्र बनल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त विक्रांत देशमुख यांनी नागरिकांना ८७८८६४९८८५ या 'ट्रॅफिक बडी' व्हॉट्सअ‍ॅप क्रमांकाचा अधिकाधिक वापर करून वाहतूक व्यवस्थापनात सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

---

# पिंपरी कॅम्प मधील रस्ता आता 15 मीटर होणार : अण्णा बनसोडे

## साई चौक-शास्त्री उद्यान मार्ग 15 मीटर करण्यास सकारात्मक संकेत; व्यापाऱ्यांच्या उपस्थितीत होणार प्रत्यक्ष मोजणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी कॅम्प मधील साई चौक ते शास्त्री उद्यान हा रस्ता रुंदीकरण करण्याचे काम महानगरपालिकेने हाती घेतले आहे. या परिसरात रस्ते मोजणी करण्यात येणार आहे. हा रस्ता १८ मीटर ऐवजी १५ मीटर रुंद करावा या व्यापाऱ्यांच्या मागणीला आयुक्तांनी सहमती दर्शवली आहे अशी माहिती विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी दिली.



विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या नेतृत्वाखाली मनपा आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या समवेत ऑटो क्लस्टर येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. नगरसेवक डब्बू आसवानी, पिंपरी चिंचवड मर्चंट फेडरेशनचे अध्यक्ष श्रीचंद आसवानी, नगरसेवक सविता आसवानी, जेष्ठ नेते धनराज आसवानी, जीतू मगतानी, जॉनी थडानी, सुरेश धनवानी, अमर बजाज, पेहलाज वाधवानी, मनोहर जेठवाणी, गोपी धनवाणी, दिनेश मुलचंदानी, आशा धनवाणी, गणेश चटले यांच्या समवेत २०० व्यापारी, प्रतिनिधी उपस्थित होते.

हा रस्ता १८ मीटर रुंदीकरण केल्यानंतर येथील व्यापाऱ्यांना व्यवसाय व राहण्यासाठी जागा शिल्लक राहणार नाही. मागील बाजूला रेल्वे लाईन असल्यामुळे अरुंद पट्टा शिल्लक राहील. यासाठी मागील अनेक दिवसांपासून हे रुंदीकरण १५ मीटर करण्यात यावे, यासाठी पिंपरी चिंचवड मर्चंट फेडरेशनच्या माध्यमातून श्रीचंद आसवानी, डब्बू आसवानी यांनी पाठपुरावा केला होता.

या बैठकीत आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी आश्वासन दिले की, व्यापाऱ्यांच्या मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करून स्थानिक लोकप्रतिनिधी व पिंपरी चिंचवड मर्चंट फेडरेशनच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत या ठिकाणी १५ मीटर रस्ता रुंदीकरणासाठी मोजणी करण्यात येईल.

श्रीचंद आसवानी सांगितले की, पिंपरी कॅम्प मधील साई चौक ते शास्त्री उद्यान हा रस्ता १५ मीटर रुंदीकरणासाठी लोकप्रतिनिधी व व्यापाऱ्यांनी होकार दिला आहे. सर्व व्यापाऱ्यांच्या एकजुटीमुळे ही मागणी प्रशासनाने मान्य केली. व्यापाऱ्यांनी अशीच एकी दाखवून पिंपरी कॅम्पातील इतर समस्या सोडवण्यासाठी पाठबळ द्यावे असे श्रीचंद आसवानी यांनी सांगितले.

# पिंपरी-चिंचवडमध्ये महाराष्ट्रातील सर्वात मोठा लक्ष्मी-नारायण पूजन सोहळा!

## तब्बल 330 अधिक ब्राह्मण दांपत्यांचे पाद्यपूजन, सन्मान व स्नेहभोजन, भाजपा आमदार महेश लांडगे यांचा धर्म, संस्कृती परंपरा संवर्धनाचा संदेश

**पिंपरी | प्रतिनिधी**

हिंदू धर्मातील पवित्र अधिक मासाच्या पावन पर्वानिमित्त धर्मसंस्कृतीचे जतन, संवर्धन आणि सनातन परंपरांचा गौरव करण्याच्या उद्देशाने पिंपरी-चिंचवडमधील मोशी येथे महाराष्ट्रातील सर्वांत मोठा लक्ष्मी-नारायण पूजन सोहळा भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. या भव्य धार्मिक सोहळ्याचे आयोजन भोसरी विधानसभा मतदार संघाचे आमदार व भाजपाचे नेते महेश लांडगे आणि शिवांजली सखी मंचच्या प्रमुख पूजा महेश लांडगे यांच्या पुढाकारातून करण्यात आले.



जय गणेश लॉन, मोशी येथे आयोजित या अध्यात्मिक सोहळ्यात राज्यभरातून आलेल्या तब्बल 330 अधिक ब्राह्मण दांपत्यांचे विधिवत पाद्यपूजन, लक्ष्मी-नारायण पूजन, सन्मान व स्नेहभोजन आयोजित करण्यात आले. वेदमंत्रांच्या मंगलमय घोषात आणि धार्मिक वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमाने उपस्थित भाविकांना अध्यात्मिक ऊर्जा व सनातन संस्कृतीचे दर्शन घडविले. मंचावरील श्री. विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होती

अधिक मास हा हिंदू धर्मशास्त्रानुसार अत्यंत पुण्यदायी मानला जातो. या काळात दान, धर्म, जप, तप आणि पूजनाला विशेष महत्त्व असल्याने ब्राह्मण दांपत्यांचा सन्मान करून धर्मसेवेची परंपरा जोपासण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. कार्यक्रमात सहभागी झालेल्या ब्राह्मण दांपत्यांना सन्मानपूर्वक आहेर प्रदान करण्यात आले.

या भव्य सोहळ्यास कला, शिक्षण, आरोग्य, प्रशासकीय, धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची उल्लेखनीय उपस्थिती लाभली. विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठित व्यक्ती, सामाजिक कार्यकर्ते, उद्योजक, महिला प्रतिनिधी तसेच हजारो नागरिकांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून धर्मसंस्कृतीप्रती आपली बांधिलकी व्यक्त केली. उपस्थित मान्यवरांनी या उपक्रमाचे कौतुक करत समाजात धार्मिक आणि सांस्कृतिक मूल्यांचे संवर्धन करण्यासाठी अशा कार्यक्रमांची आवश्यकता अधोरेखित केली.

यावेळी आमदार महेश लांडगे म्हणाले, "अधिक मासाच्या निमित्ताने समाजात धार्मिक, सांस्कृतिक आणि नैतिक मूल्यांचे संवर्धन व्हावे, तसेच सनातन परंपरांचा गौरव पुढील पिढीपर्यंत पोहोचावा, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे." तसेच, शिवांजली सखी मंचच्या प्रमुख पूजा लांडगे यांनीही धर्मकार्य, संस्कार संवर्धन आणि समाजप्रबोधनासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. धर्म, संस्कृती, श्रद्धा आणि सामाजिक एकात्मतेचा संगम ठरलेल्या या भव्य सोहळ्याने अधिक मासातील पुण्यपर्वाला एक विशेष अध्यात्मिक उंची प्राप्त करून दिली. महाराष्ट्रातील सर्वांत मोठ्या लक्ष्मी-नारायण पूजन सोहळ्याच्या माध्यमातून सनातन संस्कृतीच्या जतनाचा आणि समाजप्रबोधनाचा प्रभावी संदेश देण्यात आला.

> **"अधिक मास हा केवळ धार्मिक विधींचा कालखंड नसून, आत्मशुद्धी, संस्कार संवर्धन आणि समाजप्रबोधनाची एक पवित्र संधी आहे. ब्राह्मण दांपत्यांचा सन्मान, धर्मपरंपरांचे जतन आणि समाजात अध्यात्मिक मूल्यांची रुजवणूक करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम आयोजित केला. सनातन हिंदू संस्कृतीची ही अमूल्य परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी आपण सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. धर्म, संस्कृती आणि समाजसेवा यांचा संगम घडविणारे असे उपक्रम समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण करतात. प्रत्येकाच्या जीवनात श्रद्धा, सदाचार आणि सेवाभाव वृद्धिंगत होवो, हीच प्रभू श्री लक्ष्मी-नारायण चरणी प्रार्थना आहे.""**
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे..**



# दुबई ते बँकॉक.. अखेर सायबर रॅकेटचा मास्टरमाइंड जेरबंद..!

## पिंपरी-चिंचवड सायबर पोलिसांची आंतरराष्ट्रीय पातळीवरील मोठी कारवाई; कोट्यवधींच्या फसवणुकीमागील मुख्य सूत्रधाराला भारतात आणले

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड सायबर पोलिसांनी आंतरराष्ट्रीय स्तरावरील मोठी कारवाई करत दुबई आणि थायलंडमधून सायबर फसवणुकीचे जाळे चालवणाऱ्या मुख्य सूत्रधाराला अखेर अटक केली आहे. इंटरपोलच्या रेड कॉर्नर नोटीस आणि लुकआऊट सर्कुलरच्या मदतीने थायलंडमधील बँकॉक विमानतळावर त्याला ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर भारतात आणून त्याच्यावर अधिकृत अटकेची कारवाई करण्यात आली.



अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव सौरभ उर्फ गणेश बाळासो काळे असे असून, त्याच्या अटकेमुळे महाराष्ट्रासह देशभरातील अनेक मोठ्या सायबर गुन्ह्यांची उकल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

देहूरोड पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या ऑनलाइन टास्क फ्रॉड प्रकरणाच्या तपासादरम्यान या आंतरराष्ट्रीय सायबर रॅकेटचा पर्दाफाश झाला होता. जून २०२४ मध्ये या प्रकरणात १३ आरोपींना अटक करण्यात आली होती. चौकशीत गणेश काळे हा दुबईतून संपूर्ण रॅकेटचे संचालन करत असल्याचे निष्पन्न झाले.

तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, काळे भारतातील विविध व्यक्तींकडून बँक खाती, एटीएम कार्ड, चेकबुक, इंटरनेट बँकिंग आयडी आणि पासवर्ड मिळवत होता. त्याबदल्यात संबंधितांना पैसे दिले जात होते. या खात्यांचा वापर सायबर फसवणुकीतून मिळालेली रक्कम विविध ठिकाणी वळवण्यासाठी केला जात होता. यासाठी त्याने दुबईमध्ये स्वतंत्र कार्यालयदेखील उभारले होते

सायबर पोलिसांच्या तांत्रिक तपासातून आरोपीचे चीनसह इतर विदेशी नागरिकांशी संबंध असल्याचेही समोर आले आहे. टास्क फ्रॉड, शेअर मार्केट गुंतवणूक फसवणूक तसेच डिजिटल अरेस्टसारख्या विविध प्रकारच्या सायबर गुन्ह्यांमधून नागरिकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा आरोप आहे. हिंजवडीतील १८ लाख रुपयांच्या फसवणूक प्रकरणात तसेच पिंपरी-चिंचवड सायबर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या २ कोटी ६६ लाख रुपयांच्या फसवणूक प्रकरणातही त्याचा सहभाग आढळून आला आहे. दरम्यान, सप्टेंबर २०२५ मध्ये तो दुबईहून बँकॉकला पळून गेला होता. मात्र, इंटरपोलच्या मदतीने त्याचा माग काढण्यात पोलिसांना यश आले.

११ जून रोजी मुंबई विमानतळावर पिंपरी-चिंचवड सायबर पोलिसांच्या विशेष पथकाने त्याचा ताबा घेतला. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक रविकिरण नाळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. सायबर गुन्हेगारांविरोधातील ही कारवाई पिंपरी-चिंचवड सायबर पोलिसांच्या इतिहासातील महत्त्वाची आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर गाजणारी मोहीम मानली जात आहे.

# वृक्षारोपणासाठी महापालिकेकडून दीड कोटींची तरतूद

## 15 क्षेत्रीय कार्यालयांना प्रत्येकी 10 लाख; टेकड्या, उद्याने आणि सार्वजनिक ठिकाणी देशी वृक्ष लागवड

**पुणे | प्रतिनिधी**

बारामती शहरासह तालुक्यात मुला-मुलींच्या हाती पालक मोठ्या अभिमानाने दुचाकी-चारचाकी वाहने सोपवत आहेत. त्यातून शहरातील काही भागांसह विविध राज्यमार्ग सध्या अपघातांचे हॉटस्पॉट बनत चालले असून, वाढत्या अपघातांमुळे नागरिकांमध्ये चिंता आहे. विशेषतः ग्रामीण भागात दुचाकींचे प्रमाण झपाट्याने वाढले असून, अल्पवयीन विद्यार्थ्यांकडून या वाहनांचा सर्रास वापर होत आहे. अल्पवयीनांच्या हाती दुचाकी का? हा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे.ब्रेकिंग न्यूज अलर्ट शाळा, महाविद्यालये, नातेवाइकांची घरे किंवा मित्रपरिवाराकडे जाण्यासाठी अनेक विद्यार्थी इलेक्ट्रिक दुचाकींचा वापर करीत आहेत. काही ठिकाणी ट्रिपल सीट प्रवास, भरधाव वाहन चालविणे तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन होत आहे. वाहनांचा आवाज कमी असल्याने रस्त्यांवरील इतर वाहनचालक आणि पादचाऱ्यांना त्यांचा अंदाज येण्यास अडचण निर्माण होत आहे.

नुकत्याच निरा-मोरगाव रस्त्यावर झालेल्या अपघातात दोघा बहिणींना आपला जीव गमवावा लागला आहे. यासारख्या घटना सातत्याने घडतात. त्यानंतर काही काळ त्याची चर्चा होते. परंतु, हा विषय आता अत्यंत संवेदनशील झाला आहे. पालकांनी मुलांच्या सुरक्षिततेबाबत अधिक जागरूक राहण्याची गरज असून, वाहन चालवताना आवश्यक कागदपत्रे, विमा, परवाना आणि सुरक्षाविषयक नियमांचे पालन करणे अत्यावश्यक आहे. विद्यार्थ्यांसाठी शक्यतो सायकलचा वापर किंवा एसटीसारख्या सुरक्षित सार्वजनिक वाहतुकीचा पर्याय स्वीकारावा लागणार आहे.

पुणे शहरात विविध विकास प्रकल्पांसाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होत असल्याच्या आरोपांदरम्यान महापालिकेने वृक्षारोपणासाठी दीड कोटी रुपयांच्या खर्चास मंजुरी दिली आहे. पर्यावरणप्रेमी आणि नागरिकांकडून वृक्षतोडीला विरोध होत असताना, पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरात देशी वृक्ष लागवडीचा उपक्रम राबविण्यात येणार आहे. याबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीने मंजूर केला आहे.

पोलिस विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि प्रादेशिक परिवहन विभाग यांनी संयुक्तपणे प्रभावी उपाययोजना राबवून वाहतूक नियमांची कडक अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. अल्पवयीन वाहनचालक व निष्काळजी पालकांवर कारवाईच्या घटना फारशा दिसून येत नसल्याने बेफिकिरी वाढल्याचे चित्र आहे.




### बोगस वृक्षलागवडी'च्या आरोपांमुळे प्रश्नचिन्ह

» महापालिकेने पूर्वी तोडलेल्या झाडांच्या बदल्यात वृक्षलागवड केल्याचा दावा केला असला तरी प्रत्यक्षात अनेक ठिकाणी ती केवळ कागदोपत्रीच राहिल्याचे आरोप होत आहेत. गणेशखिंड रस्त्यावरील वृक्षतोडीला स्थगिती देण्यात आली असली तरी इतर भागांतील वृक्षसंवर्धनाबाबत प्रश्न कायम आहेत. त्यामुळे नव्या वृक्षारोपण मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी आणि लागवड केलेल्या झाडांचे संवर्धन याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### वृक्षतोडीच्या पार्श्वभूमीवर नवा निर्णय

» पुणे शहरात विविध विकास प्रकल्पांसाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होत असल्याच्या आरोपांदरम्यान महापालिकेने वृक्षारोपणासाठी दीड कोटी रुपयांच्या खर्चास मंजुरी दिली आहे. पर्यावरणप्रेमी आणि नागरिकांकडून वृक्षतोडीला विरोध होत असताना, पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरात देशी वृक्ष लागवडीचा उपक्रम राबविण्यात येणार आहे. याबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीने मंजूर केला आहे.

### १५ क्षेत्रीय कार्यालयांमार्फत वृक्षारोपण

» महापालिकेच्या १५ क्षेत्रीय कार्यालयांना प्रत्येकी १० लाख रुपये देण्यात येणार असून या निधीतून विविध भागांत वृक्षारोपण केले जाणार आहे. पर्वती, तळजाई टेकडी, गुजर निंबाळकरवाडी तसेच शहरातील विविध टेकड्या, उद्याने आणि सार्वजनिक जागांमध्ये वड, पिंपळ यांसारख्या देशी वृक्षांची लागवड केली जाणार आहे. या मोहिमेत स्थानिक नागरिक, पर्यावरणप्रेमी, विद्यार्थी आणि महापालिका कर्मचारी यांचा सहभाग असणार आहे.

---

# आता एक दिवसाआड पाणी; पुण्यासाठी महापालिकेचे नवे वेळापत्रक जाहीर

## शहरातील जलकुंभांचे 'सम' आणि 'विषम' तारखांनुसार विभाजन; नागरिकांना पूर्वीच्याच वेळेत पाणी मिळणार

**पुणे | प्रतिनिधी**

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणातील घटता पाणीसाठा आणि यंदा पाऊस कमी होण्याच्या शक्यतेच्या पार्श्वभूमीवर येत्या सोमवारपासून (१५ जून) शहरात एक दिवसाआड पाणीपुरवठ्याच्या निर्णयाची अंमलबजावणी केली जाणार आहे. त्यासंदर्भातील वेळापत्रक महापालिका प्रशासनाकडून गुरुवारी जाहीर करण्यात आले. या वेळापत्रकानुसार पाण्याच्या टाकतून होणाऱ्या ठिकाणांचे दोन भाग करण्यात आले असून या भागांना सम आणि विषम तारखेला पाणीपुरवठा केला जाणार आहे.



महापालिकेच्या नव्या नियोजनानुसार नागरिकांना पूर्वीच्या वेळेतच पाणी मिळणार असले तरी, पाणीपुरवठा मात्र एक दिवसाआड होईल. शहरातील विविध जलकुंभ आणि त्याअंतर्गत येणाऱ्या भागांचे सम आणि विषम तारखांनुसार विभाजन करण्यात आले आहे.

महापालिकेने स्पष्ट केले आहे की, ज्या भागांमध्ये आधीपासूनच एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे, त्या भागांच्या वेळापत्रकात कोणताही बदल करण्यात आलेला नाही. फुरसुंगी, मांजरी, वाघोली, लोहगाव, खडकवासला, नांदोशी, किरकटवाडी आणि येवलेवाडी या भागांमध्ये पूर्ववत व्यवस्था कायम राहणार आहे.

येत्या सोमवारपासून (१५ जून) शहरात एक दिवसाआड पाणीपुरवठ्याच्या निर्णयाची अंमलबजावणी केली जाणार आहे. त्यासंदर्भातील वेळापत्रक महापालिका प्रशासनाकडून गुरुवारी जाहीर करण्यात आले. या वेळापत्रकानुसार पाण्याच्या टाकतून होणाऱ्या ठिकाणांचे दोन भाग करण्यात आले असून या भागांना सम आणि विषम तारखेला पाणीपुरवठा केला जाणार आहे.

### सम आणि विषम तारखांचे नियोजन

» पर्वती एलएलआर, एसएनडीटी, चतुःश्रृंगी, होळकर, विद्यापीठ, चांदणी चौक, बाणेर, म्हाळुंगे, वारजे-माळवाडी, रामनगर, कोंढवे धावडे, शिवणे, श्रीहरी, केदारेश्वर आणि धनकवडी परिसरातील नागरिकांना सम तारखांना पाणीपुरवठा केला जाईल. तर कोथरूड (लक्ष्मीनगर वगळता), बावधन, एरंडवणेचा काही भाग, संतोषनगर, आंबेगाव खुर्द, महादेवनगर, कात्रज गावठाण, सुखसागरनगर, बिबवेवाडी, लोअर इंदिरानगर, सेमिनरी हिल आणि पर्वती दर्शन परिसरांना विषम तारखांना पाणी मिळेल.

# अल्पवयीनांच्या हाती दुचाकी; बारामतीत वाढत्या अपघातांनी चिंता

## नियमांचे उल्लंघन, भरधाव वेग आणि पालकांची बेफिकिरी; वाहतूक शिस्तीवर प्रश्नचिन्ह

**पुणे | प्रतिनिधी**

बारामती शहरासह तालुक्यात मुला-मुलींच्या हाती पालक मोठ्या अभिमानाने दुचाकी-चारचाकी वाहने सोपवत आहेत. त्यातून शहरातील काही भागांसह विविध राज्यमार्ग सध्या अपघातांचे हॉटस्पॉट बनत चालले असून, वाढत्या अपघातांमुळे नागरिकांमध्ये चिंता आहे. विशेषतः ग्रामीण भागात दुचाकींचे प्रमाण झपाट्याने वाढले असून, अल्पवयीन विद्यार्थ्यांकडून या वाहनांचा सर्रास वापर होत आहे. अल्पवयीनांच्या हाती दुचाकी का? हा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे.

शाळा, महाविद्यालये, नातेवाइकांची घरे किंवा मित्रपरिवाराकडे जाण्यासाठी अनेक विद्यार्थी इलेक्ट्रिक दुचाकींचा वापर करीत आहेत. काही ठिकाणी ट्रिपल सीट प्रवास, भरधाव वाहन चालविणे तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन होत आहे. वाहनांचा आवाज कमी असल्याने रस्त्यांवरील इतर वाहनचालक आणि पादचाऱ्यांना त्यांचा अंदाज येण्यास अडचण निर्माण होत आहे.

नुकत्याच निरा-मोरगाव रस्त्यावर झालेल्या अपघातात दोघा बहिणींना आपला जीव गमवावा लागला आहे. यासारख्या घटना सातत्याने घडतात. त्यानंतर काही काळ त्याची चर्चा होते. परंतु, हा विषय आता अत्यंत संवेदनशील झाला आहे. पालकांनी मुलांच्या सुरक्षिततेबाबत अधिक जागरूक राहण्याची गरज असून, वाहन चालवताना आवश्यक कागदपत्रे, विमा, परवाना आणि सुरक्षाविषयक नियमांचे पालन करणे अत्यावश्यक आहे. विद्यार्थ्यांसाठी शक्यतो सायकलचा वापर किंवा एसटीसारख्या सुरक्षित सार्वजनिक वाहतुकीचा पर्याय स्वीकारावा लागणार आहे.

पोलिस विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि प्रादेशिक परिवहन विभाग यांनी संयुक्तपणे प्रभावी उपाययोजना राबवून वाहतूक नियमांची कडक अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. अल्पवयीन वाहनचालक व निष्काळजी पालकांवर कारवाईच्या घटना फारशा दिसून येत नसल्याने बेफिकिरी वाढल्याचे चित्र आहे बारामती परिसरातील काही प्रमुख रस्ते आणि राज्यमार्ग अपघातांचे हॉटस्पॉट ठरत आहेत. ट्रिपल सीट प्रवास, भरधाव वेग आणि वाहतूक नियमांचे उल्लंघन यामुळे गंभीर अपघातांच्या घटना वाढत आहेत..



### अपघातांचे हॉटस्पॉट बनले रस्ते

**» बारामती परिसरातील काही प्रमुख रस्ते आणि राज्यमार्ग अपघातांचे हॉटस्पॉट ठरत आहेत. ट्रिपल सीट प्रवास, भरधाव वेग आणि वाहतूक नियमांचे उल्लंघन यामुळे गंभीर अपघातांच्या घटना वाढत आहेत. नुकत्याच निरा-मोरगाव रस्त्यावर झालेल्या अपघातात दोन बहिणींचा मृत्यू झाल्याने हा विषय पुन्हा ऐरणीवर आला आहे. अशा घटनांमुळे नागरिकांमध्ये भीती आणि चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.**

### अल्पवयीन चालकांचे वाढते प्रमाण

**» बारामती शहर आणि तालुक्यात अल्पवयीन मुला-मुलींकडून दुचाकींचा वापर मोठ्या प्रमाणावर होत असल्याचे चित्र आहे. शाळा, महाविद्यालये, मित्रपरिवार किंवा इतर कामांसाठी विद्यार्थी दुचाकी आणि इलेक्ट्रिक वाहनांचा वापर करीत आहेत. अनेकांकडे वाहन चालविण्याचा परवाना नसतानाही ते रस्त्यावर वाहने चालवत असल्याने अपघातांचा धोका वाढला आहे. त्यामुळे अल्पवयीनांच्या हाती वाहनांची चावी देणाऱ्या पालकांच्या भूमिकेवरही प्रश्न उपस्थित होत आहेत.**

### कडक कारवाईची गरज

**» अल्पवयीन वाहनचालक आणि निष्काळजी पालकांवर प्रभावी कारवाई होत नसल्याने बेफिकिरी वाढत असल्याचे दिसून येत आहे. पोलिस, प्रादेशिक परिवहन विभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी संयुक्तपणे वाहतूक नियमांची कठोर अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी शक्यतो सायकल किंवा सार्वजनिक वाहतुकीचा वापर करावा, तसेच पालकांनी मुलांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत जबाबदारीने वागण्याची गरज असल्याचे मत नागरिकांकडून व्यक्त होत आहे.**

# पुणे जिल्ह्यात 13 ते 26 जूनपर्यंत जमावबंदीचे आदेश लागू

## आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार असल्याचे अपर जिल्हादंडाधिकारी ज्योती कदम यांनी सांगितले.

**पुणे | प्रतिनिधी**

ग्रामीण भागात दि.१३ जून ते २६ जून २०२६ पर्यंत जमावबंदी आदेश निवासी उपजिल्हाधिकारी यांनी लागू केला आहे. तसेच पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय पाचपेक्षा जास्त व्यक्तींचा जमाव करणे, सभा घेणे किंवा मिरवणुका काढणे यांनाही बंदी घालण्यात आली आहे.

जिल्ह्यात अपर जिल्हादंडाधिकारी ज्योती कदम यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) अन्वये जमावबंदी आदेश लागू केला आहे. या कालावधीत दाहक अथवा स्फोटक पदार्थ बाळगणे, दगड, शस्त्रे, काठ्या, तलवारी, बंदुका आदी इजा पोहोचवू शकणारी साधने बाळगणे, मोठ्याने अर्वाच्य घोषणा देणे, प्रतिकात्मक पुतळ्यांचे प्रदर्शन किंवा दहन करणे तसेच कायदा व सुव्यवस्थेला बाधा आणणारी आवेशपूर्ण भाषणे करणे यास मनाई करण्यात आली आहे.

या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम १३५ नुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे अपर जिल्हादंडाधिकारी ज्योती कदम यांनी सांगितले.

जमावबंदी काळात दाहक किंवा स्फोटक पदार्थ बाळगणे, दगड, काठ्या, तलवारी, बंदुका यांसारखी इजा पोहोचवू शकणारी साधने जवळ बाळगण्यास बंदी घालण्यात आली आहे. तसेच मोठ्याने घोषणा देणे, प्रतिकात्मक पुतळ्यांचे प्रदर्शन किंवा दहन करणे आणि कायदा-सुव्यवस्थेला बाधा आणणारी प्रक्षोभक भाषणे करण्यासही मनाई करण्यात आली आहे.




### १३ ते २६ जूनदरम्यान विशेष निर्बंध

**» पुणे ग्रामीण जिल्ह्यात १३ जून ते २६ जून २०२६ या कालावधीत जमावबंदी आदेश लागू करण्यात आला आहे. निवासी उपजिल्हाधिकारी तसेच अपर जिल्हादंडाधिकारी ज्योती कदम यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) अन्वये हा आदेश जारी केला आहे. या काळात पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय पाचपेक्षा जास्त व्यक्तींचा जमाव, सभा किंवा मिरवणुका काढण्यास मनाई करण्यात आली आहे.**